## नि.दि.मु.क्र.२४/२०१५ मधील निशाणी ७३ ते ७५ वरील संयुक्तीक आदेश

**सीएनआर क्र. एमएचएसआय०५–०००१२७२०१५**

निशाणी ७३ कडील अर्ज मयत प्रतिवादी क्र. ६ सावळाराम श्रीधर चोडणकर यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफीसाठी, निशाणी ७४ कडील अर्ज मयत प्रतिवादी क्र. ६ विरुध्द दावा अवसान पावला (अबेट) तो आदेश रद्द करण्यासाठी व निशाणी ७५ कडील अर्ज मयत प्रतिवादी क्र. ६ चे वारस अभिलेखावर घेवून दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी यासाठी दाखल करण्यात आलेला आहे.

**०२.** वादी क्र.१ याचे असे म्हणणे आहे की प्रतिवादी क्र. ६ सावळाराम श्रीधर चोडणकर हे दि. ०९/०५/२०२० रोजी मौजे शिरोडा येथे त्यांच्या राहत्या घरी मयत झालेले आहेत. कोरोना विषाणूंच्या संसर्गापासून बचावात्मक खबरदारीचा भाग म्हणून दि. ०९/०५/२०२० रोजी नंतरच्या कालावधीत कोर्ट कामकाज काही प्रमाणात बंद असल्याने मयत प्रतिवादी नं. ६ चे वारस मुदतीत अभिलेखावर दाखल न केल्याने त्यांच्याविरुध्द दावा अबेट झालेला आहे. त्यामुळे वादी क्र. १ याला सदरचा अर्ज दाखल करण्यास १ वर्षे १ महिना १ दिवसांचा विलंब झालेला असून सदरचा विलंब हा केवळ अपरिहार्य कारणामुळे झालेला आहे . यामध्ये वादी क्र .१ चा कोणताही निष्काळजीपणा नाही. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे अर्जांवर देवून त्यांचा आक्षेप नोंदविलेला आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की सदरचा दावा हा मयत प्रतिवादी क्र . ६ विरुध्द अवसान पावला आहे, अर्जात दिलेले कारण संयुक्तीक नाही, त्यामुळे सदरचे अर्ज खर्चासहीत फेटाळण्यात यावेत अशी त्यांनी विनंती केली.

**०३.** दोन्ही बाजूच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला . कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र. ६ हा मयत झाला या तथ्याबाबत प्रतिवादी यांनी कोणताही वाद उपस्थित केलेला नाही. प्रतिवादी क्र. ६ मयत असलेचा मृत्यूदाखला नि.७७ सोबत अभिलेखावर दाखल आहे. प्रतिवादी क्र. ६ च्या मृत्यूनंतर त्याच्या कायदेशीर प्रतिनिधींविरुध्द दावा पुढे चालविण्याचा वादींचा अधिकार टिकून राहत आहे. अर्जात नमूद केलेले कारण हे शपथेवर नमूद करण्यात आलेले आहे व ते संयुक्तीक आहे असे

मला वाटते. सबब, तिन्ही अर्ज मंजूर करण्यात येतात.

**०४.** मयत प्रतिवादी क्र. ६ चे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेण्यास झालेला १ वर्षे १ महिना व १ दिवसाचा विलंब माफ करण्यात येतो . तसेच मयत प्रतिवादी क्र. ६ विरुध्द दावा अवसान पावल्याचा आदेश रद्द करण्यात येतो. वादी क्र. १ याला मयत प्रतिवादी क्र . ६ च्या कायदेशीर प्रतिनिधींना अभिलेखावर घेण्यास परवानगी देण्यात येते. त्याअनुषंगे पुढील तारखेस अथवा तत्पुर्वी दावा दुरुस्ती करण्यात यावी व दुरुस्त दाव्याची प्रत सादर करण्यात यावी.

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात घोषीत केला.)

सही/-

दि. २३/०२/२०२४ ( के.के.पाटील)

वेंगुर्ला दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर वेंगुर्ला